# वांझपणा : कारणे व उपाय

**डॉ. चैतन्य पावशे**

पशुजनन, मादीरोग व प्रसुतीशास्त्र विभाग

स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशु विज्ञान संस्था, अकोला.

गायी व्याल्यानंतर नियमीतपणे माजावर येवून गाभण राहिल्यास व्यवसायाकरीता फायदेशीर ठरतात. साधारणपणे गाईपासुन वर्षाला एक वेत मिळणे दुग्धव्यवसाय किफायतशीर होण्यासाठी अत्यंत गरजेचे असते. परंतु काही गायी व्याल्यानंतर योग्य वेळेत माजावर येत नाहीत याला वाझंपणा असे म्हणतात.

वाझंपणा हा दोन प्रकारचा असतो.

**१. कायमस्वरुपी वाझंपणा**

वाझंपणाच्या ह्या प्रकारात गाईची प्रजनन क्षमता काही विशिष्ट कारणांमुळे नष्ट झालेली असते. अशा वाझंपणासाठी काही उपचार नसतो. उदा. स्त्रीबीजांडाची वाढ न होणे, गर्भशयाची अपुरी वाढ, इ.

**२. तात्पुरता वाझंपणा**

तात्पुरता वाझंपणा यामध्ये प्रजननक्षमता काही अवधी/ काळासाठी काही विशिष्ट घटकामुळे नष्ट/कमी झालेली असते. तात्पुरता वाझंपणा हा योग्य औषधोपचार करुन बरा होऊ शकतो. उदा. आहारातील दोष, प्रजननसंस्थेचे आजार, इ. तात्पुरत्या वांझपणाची काही महत्वाची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

**१. प्रजनन संस्थेचे आजार**

गाईला होणाऱ्या प्रजनन संस्थेच्या आजारामुळे प्रजननक्षमता काही कालावधीकरिता खंडीत होते. उदा. ब्रुसेलासीस, इ.

**२. आहारातील दोष किंवा अयोग्य आहार**

गाईमधील योग्य प्रजननकरिता उर्जा, प्रथिने स्निग्धपदार्थ, खनिजे व जीवनसत्वे यांचा आहारामध्ये समावेश असणे गरजेचे असते. असंतुलीत आहार किवा आहारामधील एखाद्या किंवा अनेक घटकाच्या कमतरतेमुळे गाईमध्ये वंधत्व येते.

**३. विविध रोगांचा ताण**

गाईमधील विविध जीवाणूजन्य तसेच विषाणुजन्य रोगांचा प्रादुर्भाव होत असतो. रोगामुळे शरीरामध्ये ताण निर्माण होतो व शरीरातील संप्रेरके यांचे संतुलन बिघडते. यामुळे तात्पुरता वाझंपणा तयार होतो.

**४. व्याल्यानंतर अयोग्य देखभाल**

व्याल्यानंतर गाईची देखभाल (बसण्याची जागा, पाणी, खाद्य, व्यायाम) संतुलीत करणे गरजेचे असते परंतु अस्वच्छ गोठा व बसण्याची जागा, कमी प्रतीचा आहार यामुळे गाईमध्ये ताण निर्माण होतो. काही गाईमध्ये गर्भाशयाचा जंतुसंसर्ग होतो व गर्भाशयाचे विकार जडतात. यामुळे तात्पुरता वाझंपणा निर्माण होतो.

वाझंपणा कमी करण्याकरिता पशुपालकांनी घ्यावयाची काळजी

१. गाई योग्य वयात (देशी गाई जन्मानंतर अडीच ते तीन वर्षे व संकरीत गाई दीड वर्षानी) माजावर न आल्यास पशुवैद्यकाकडून तपासणी व योग्य मार्गदर्शन घ्यावे.

२. गाय व्यालानंतर ६० दिवसांनी माजावर न आल्यास पशुवैद्यकाकडून गाईची लैंगिक तपासणी करुन घ्यावी.

३. गाईला संतुलित आहार हा त्याच्या वजनाच्या व दुध उत्पादनाच्या प्रमाणात द्यावा.

४. गाईंना दर तीन महिन्यांनी जंत निर्मुलनाचे औषध पशुवैद्यकाच्या सल्यानुसार द्यावे.

५. गाईंना दररोज खनीजमिश्रण व जीवनसत्वे यांची पावडर (५० ते १०० ग्रॅम) आंबोणामधून द्यावी.

६. गाईची चांगली देखभाल व व्यवस्थापन करावे.